# <u>जाहीर नोटीस</u>

याद्वारे तमाम पुरवठादार यांस कळविणेत येते की, मे. जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग येथिल अभिलेख कक्षासाठी 225 Ah क्षमतेच्या बॅटरीसह एक इन्व्हर्टर युनिट खरेदी करणेसाठी दरपत्रके मागविणेत येत आहेत.

## <u>अटी व शर्ती</u>

१) दरपत्रक आवश्यक त्या संपुर्ण तपशिलासह तारखेसहीत, बंद लखोटयामधून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग, मु.ओरोस यांचे नावे असावेत. लखोटयावर "इन्व्हर्टर व बॅटरी खरेदीकरीता दरपत्रक" असा उल्लेख करणेत यावा.

२) दरपत्रक सादर करणा—या पुरवठादार यांची वस्तू व सेवा करांतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.

३) पुरवठादार जुना इन्व्हर्टर व बॅटरी Buy Back ने घेणेस तयार असतील तर त्यांच्या Buy Back रक्कमेचा दरपत्रकामध्ये स्पष्ट उल्लेख असावा.

४) वस्तूंच्या दर्जाबाबत खात्री पुरवठादार यांनी दयावयाची आहे. हमी कालावधीमध्ये इन्व्हर्टर व बॅटरीमध्ये बिघाड झाल्यास ते नव्याने पुरविणे बंधनकारक राहील.

५) अभिलेख कक्षामधील इन्व्हर्टर युनिट बसविणेकरीता येणारा खर्च, वहातूक खर्च तसेच तत्संबंधी येणारा अन्य खर्च संबंधीत पुरवठादार यांनी सोसावयाचा आहे.

६) जाहीर निविदेमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

७) सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

८) अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग—ओरोस यांचा राहील.

तरी इच्छुकांनी पुढील अटी व शर्तीस अधीन राहून ही निविदा प्रसिध्द केलेपासून **१० दिवसांच्या** आत आपली दरपत्रके जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग, मु.ओरोस येथे सादर करावीत.

दिनांक :—२८/०६/२०२४

(सही)
सहाय्यक अधीक्षक(वित्त),
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

म.जा.क्र.ग्रंथा/ ३३६९ सन २०२४
जिल्हा न्यायालय, सिंधुदूर्ग—ओरोस
दिनांक :— २८/०६/२०२४

प्रत माहितीसाठी व जरूरत्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

१. मा. दिवाणी न्यायाधीश(व.स्तर), सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)
२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)
३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)
४. मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग (ई—मेलद्वारे)
५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग—ओरोस (ई-मेल)
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग—ओरोस (ई-मेल)
७. मा.जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस यांचे नोटीसबोर्डवर
८. डी.एस्.ए., जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता